सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००४१४७

**अपिलार्थी श्री. सुमिर सबरवाल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
हिलरोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई – ५०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-९)**
हिलरोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई – ५०.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १८.०६.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०१.२०२० | ०८.०२.२०२० | १८.०६.२०२० | १६.१०.२०२० |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.१०.२०२० रोजीच्या अर्जांन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २३.०१.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. १६.०१.२०२० रोजी केलेली तक्रारीवर करण्यात आलेली कार्यवाही विषयी माहिती विचारलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.०८.०२.२०२० अनुसार अपिलार्थींना माहिती पाठविलेली आहे की, त्यांचे तक्रार अर्ज बीएमसी कार्यालयाशी संबंधीत असल्याने मुळ तक्रार अर्ज व संबंधीत कागदपत्रे बीएमसी कार्यालय, वांद्रे, मुंबई या ठिकाणी पाठविण्यात आलेले आहे. अपिलार्थींना जावक क्रमांक विषयी माहिती देण्यात आली होती. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दि. ०५.०३.२०२० व दि. १७.०२.२०२० रोजी पोस्टाने पाठविली. अपिलार्थींचे सदर माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १८.०६.२०२० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१०.२०२० अनुसार जन माहिती अधिकारी यांच्या मताशी सहमती दर्शवून प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. २०.०६.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी निवेदन सादर करुन नमुद केले की, त्यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढलेले आहे.**

प्रदीप व्यास 27-6-2024

**मुंबई**
**दिनांक : २७.०६.२०२४**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**